MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)
आयएसओ ९००१:२००८ मानांकित संस्था
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com | दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
संकेतस्थळ : www.mcaer.org | फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१४१८ | दि. ८ जून,२०१८

## प्रेसनोट

### <u>कृषी विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया २०१८-१९</u>

राज्यात चार कृषी विद्यापीठांमध्ये दहा विद्याशाखांमध्ये पदवी अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. या अभ्यासक्रमाची १८७ महाविद्यालये सध्या कार्यरत आहेत. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत ७१, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत ३६, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत ५४ आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत २६ अशी विद्यापीठनिहाय महाविद्यालये आहेत. पदवी अभ्यासक्रम चार वर्षे कालावधीचा असून या महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता १५,२२७ आहे. यापैकी ३१ महाविद्यालये शासकीय, २ अनुदानित आणि १५४ महाविद्यालये कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील आहेत.

बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान), बी. टेक. (जैवतंत्रज्ञान), बी.एफ.एससी. (मत्स्यशास्त्र) आणि बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) या अभ्यासक्रमांना शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रम घोषित केले आहे. बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) हा अभ्यासक्रम व्यावसायिक म्हणून घोषित करण्यात आलेला नाही.

यापैकी बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान), बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली दि. ११ जून,२०१८ पासून सुरु होत आहे. उर्वरित बी.एफ.एससी. (मत्स्यशास्त्र), बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) आणि बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येईल.

शासकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमतेतील ५ टक्के जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकरिता, २ टक्के जागा राज्याबाहेरील उमेदवारांकरिता राखीव ठेवून उर्वरित जागांच्या ३० टक्के जागा महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांकरिता (महाराष्ट्र कोटा) व ७० टक्के जागा संबंधित कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून इ. १२ (विज्ञान) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी (कृषी विद्यापीठ कोटा) राखीव ठेवण्यात येणार आहे. जम्मू आणि काश्मीर या राज्यातील स्थलांतरित नागरिकांची मुले, लष्कर आणि लष्करसम व अखिल भारतीय दहशतवादविरोधी सेवा यामधील अधिकारी /

कर्मचारी यांची मुले यांना प्रत्येक शासकीय महाविद्यालयामध्ये प्रवेश क्षमतेव्यतिरिक्त एक जागेवर प्रवेश देण्याची तरतूद आहे. कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये २० टक्के जागा संस्थास्तरीय कोटयाकरिता राखीव ठेवून उर्वरित जागांपैकी ३० टक्के महाराष्ट्र कोटा आणि ७० टक्के कृषी विद्यापीठ कोटा असे जागांचे वाटप असेल. याअंतर्गत सांविधानिक व समांतर आरक्षण निश्चित करण्यात येईल. शासनाच्या धोरणानुसार यावर्षापासून प्रथमच अनाथ उमेदवारांकरिता १ टक्के जागा राखीव ठेवण्यात येणार आहेत.

इ. १२ वी (विज्ञान) आणि MHT-CET / JEE / AIEEA-UG (भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडून घेण्यात येणारी सामायिक प्रवेश परीक्षा) या सामायिक प्रवेश परीक्षांमध्ये उमेदवाराने घेतलेल्या गटानुसार (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित) उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येणार आहे. इ. १२ वी (विज्ञान) मधील टक्केवारीच्या ३० टक्के गुण आणि सामायिक प्रवेश परीक्षेतील संबंधित गटातील गुणांच्या टक्केवारीच्या ७० टक्के गुण तसेच इतर अधिभार (उदा. शेतजमीन, इ. १२ वी तील व्यावसायिक / वैकल्पिक विषय, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, क्रीडास्पर्धामध्ये, वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व या राज्यस्तरीय स्पर्धा इत्यादीकरिताचे गुण) असे मिळून उमेदवाराची गुणवत्ता निश्चित करण्यात येणार आहे.

प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दि. ५ जुलै,२०१८ आहे. ऑनलाईन प्रवेश अर्जामध्ये उमेदवाराची वैयक्तिक माहिती, शैक्षणिक माहिती, तसेच महाविद्यालयांचे विकल्प भरून संबंधित मूळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावयाची आहेत. उमेदवारांची जास्तीत जास्त महाविद्यालयांचे विकल्प भरावेत असेही आवाहन करण्यात येत आहे. उमेदवाराची गुणवत्ता, प्रवर्ग आणि विकल्प हया बाबी विचारात घेऊन प्रवेशाचे वाटप करण्याची पध्दती अवलंबिली जाणार आहे. प्रवेश प्रक्रियेंतर्गत एकूण चार ऑनलाईन प्रवेश वाटप फे-या राबविण्यात येणार असून उर्वरित रिक्त जागा 'जागेवरील वरील प्रवेश फेरी' (spot admission round) भरण्यात येणार आहेत. प्रवेश प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक यासोबत जोडले आहे.

प्रवेश प्रक्रिया विषयक माहिती, कार्यपध्दती, आरक्षण इत्यादी सर्व बाबींचा समावेश असलेली प्रवेश माहिती पुस्तिका संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेकरिता http://www.dtemaharashtra.gov.in / http://www.mcaer.org / maha-agriadmission.in ही संकेतस्थळे कार्यरत असतील. प्रवेशोच्छुक उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून, त्यातील सूचनांचे, कार्यपध्दतीचे नीट आकलन करून संकेतस्थळावर अचूक प्रवेश अर्ज दाखल करावेत.

(रविंद्र जगताप) भा.प्र.से
महासंचालक, महाराष्ट्र कृषी
शिक्षण व संशोधन परिषद तथा
सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण